# भूख से बिलखता भारत- Hunger in India 2017

**प्रा.डॉ. प्रदीप पंजाबराव दंदे**
Asstt.Professor,
Vidarbha Youth Welfare Society Amravati's Mahila Art Commerce College Chandur Rly,
Dist. Amravati PIN - 444709

Received Sept. 16, 2017 Accepted Oct. 15, 2017

ग्लोबल हंगर इंडेक्स (Global Hunger Index-GHI-2017) च्या अहवालात भारत हा जगातील उपासमारीत 100 व्या स्थानावर फेकल्या गेला. इंटरनॅशनल फूड पोलिसी रिसर्च इन्स्टिट्यूटने नुकताच हा अहवाल प्रसिद्ध केला. झारखंड मधील अकरा वर्षीय मुलगी संतोषी व रिक्षाचालक बैजनाथ यांचे भूकबळी मुळे झालेले मृत्यू दरम्यान प्रसिध झालेला GHI अहवाल हा भारतातील वाढत्या भूकबळीवर एकप्रकारे शिक्कामोर्तबच करतो.अमेरिका,इंग्लंड,जर्मनी,जपान असे अति प्रगत देश वगळता पाहणी केलेल्या 119 देशांपैकी भारत 100 व्या स्थानावर असल्याचे या अहवालात स्पष्ट केले आहे.2016 साली भारत 97 व्या स्थानावर होता.भारतातील 31.4टक्के लोक भुकेने व्याकुळ असल्याचा हा अहवाल सांगतो. म्हणजे भारतातील चार मुलापैकी एक मुलगा हा कुपोषित आहे.130 कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात सकल घरेलू उत्पादनात मागील दोन दशकात पाच टक्के वाढ झाली. तर कृषी उत्पादनात भारत जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.अन्नधान्य उत्पादनात मोठी मजल मारून ही भारतात 31.4% नागरिक अन्नान दशेत आहेत ही बाब चिंता जनक असल्याचा ठपका ही या अहवालाने ठेवला आहे. दक्षिण आशियातील भारत देशांनंतर अफगाणिस्तान,पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेतील मादागास्कर,सियेरा लियोन, चाड,घाना,नायजर,देशात उपासमारीची स्थिती अति गंभीर आहे. -IFPRI व कन्सर्ण वर्ल्डवाईड आणि वेलथहंगरहिलफे यांनी संयुक्तपणे हा अहवाल प्रसिद्ध केला. कुपोषण,पाच वर्ष आतील मुलांची वाढ न होणे तसेच पाच वर्षा आतील मुलांचे वय व त्या तुलनेत असणारे वजन कमी असणे आणि बालमृत्यू (Undernourishment,Child Wasting,Child Stunting under five year and Child Mortality) या मुख्य निकषांच्या आधारावर ग्लोबल हंगर इंडेक्स 2017 अहवाल प्रसिद्ध केल्या गेला.

### भारतातील उपासमारीची स्थिती

1.भारतात 31.4% लोक कुपोषित आहेत.

2. बालमृत्यूचे प्रमाण 20 %आहे.

3.भारतातील चार मुलांपैकी एक मुलगा कुपोषित आहे.

4.तीन मुलापैकी एक मुलगा कमी वजनाचा आहे.(35.7%)

5.भारतात दररोज ३.००० मूल कुपोषणामुळे मरतात.

ब्राझील,रशिया,इंडिया,चीन,साऊथ आफ्रिका या ब्रिक्स देशात ब्राझील 18 व्या, रशिया 22 व्या,चीन29 व्या,साऊथ आफ्रिका 55व्या तर भारत 100 व्या स्थानावर आहे. भारत शेजारील नेपाळ-72,श्रीलंका-84 ,बांगलादेश 88 व्या स्थानावर आहेत. तर पाकिस्तान-106,अफगाणिस्तान -107 व्या स्थावर असल्याने तेथील स्थिती गंभीर आहे.

### अन्नसुरक्षा नव्हे "बॅलन्स डाएट"

भारतात गरिबी,कुपोषण निर्मूलनासाठी अन्न सुरक्षा कायदा,एकात्मिक बाल विकास योजना- ICDS,मिड डे मिल,राष्ट्रीय आरोग्य मिशन,ह्या योजना कार्यरत आहेत.परंतु तरीही भारतातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यात त्या अपयशी ठरल्या आहेत.

पिडीएस च्या माध्यमातून दिल्या जाणारे राशनचे धान्य एका महिन्यासाठी प्रति व्यक्ती तीन किलो म्हणजे एक वेळच्या जेवणासाठी पन्नास ग्राम येते.डॉक्टर ज्यांना सांगतात त्यांच्यासाठी हा डाएट ठीक आहे पण घाम गाळणाऱ्या कष्टकरी माणसांना तो अपुरा पडतो. त्यामुळे अन्न सुरक्षा कायद्यात गरिबांना मिळणारा बॅलन्स डाएट हा घटक उपासमारीस कारणीभूत आहे.आधी गरिबांना प्रति कुटुंब 35 किलो धान्य भेटत होते.आता केवळ अंतोदय कार्ड धारकांनाच 35 किलो धान्य मिळते.व अश्या अंत्योदय कार्डधारकांची संख्या एका राशन दुकानदाराकडे पाच पन्नास एवढीच आहे.

### अन्नाची उपलब्धता व नासाडी

भारत हा जगातील अन्नधान्य उत्पादनात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.एफसीआय च्या गोदामात,रेल्वे गोदामात 62,000 टन धान्याची नासाडी होत ते परंतु गरिबांना ते मिळत नाही.सुप्रीम कोर्टाने धान्य सडण्यापेक्षा ते गरिबांना मोफत वाटा असा आदेशही दिला होता.तरीही सरकारने ते धान्य गरिबांना वाटले नाही.एफसीआय च्या गोदामात धान्य सडत नाही ते सडविल्या जाते मग ते दारू कारखानदारांना 15-20 पैसे किलोने दिल्या जाते.यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो.त्यामुळे पिडीएस हे भ्रष्टाचाराचं कुरण बनले आहे.

पिडीएस मधील भ्रष्टाचार कमी व्हावा म्हणू आधार कार्ड राशन कार्ड सोबत लिंक करण्याचे शासनाने ठरविले यामुळे आधार असेल तरच राशन मिळू लागले .त्यामुळे भ्रष्टाचार काही प्रमाणात कमी झाला, पण आधार कार्ड नसल्याने झारखंडमधील संतोषी च्या कुटुंबाला मागील सहा महिन्यांपासून राशन मिळाले नाही परिणामी तिचा भूकबळी गेला.अशीच स्थिती रिक्षाचालक बैधनाथ यांच्या कुटुंबाचीही

आहे.शाळा मधून दिल्या जाणारे मध्यान्न भोजन किती महत्वाचे आहे.हे संतोषीच्या मुत्यूमुळे लक्षात येते.संतोषी ही शिमगे डा येथील शाळेत शिकायला होती झारखंड,पश्चिम बंगाल मध्ये दुर्गा पूजा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केल्या जातो.त्यामुळे तेथील शाळांना आठ दिवस सुट्ट्या असतात.संतोषिच्या शाळेलाही सुट्ट्या असल्याने शाळेत मिळणारे मध्यान्न भोजन तिला मिळाले नाही आणि घरात राशन नाही अश्या स्थितीत भट भट (भात-भात) करत संतोषी मेल्याचे तिची आई सांगते. एकीकडे आपण दुर्गा मूर्तीला वाटेल तेवढे नैवद्धय देतो तर दुसरीकडे संतोषी सारख्या जिवंत दुर्गा अन्नाशिवाय मरते असा विरोधाभास आहे.

**भूकबळीस असमानता हेच कारण**

या वर्षीच्या ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये उपासमारी साठी असमानता इ कारण आहे का?याची तपासणी करणे हा मुख्य विषय होता.यात असे दिसून आले की,कमी सामाजिक,आर्थिक,राजकीय शक्ती असलेल्या गरीब कुटुंबाना विशेषतः महिला,जातीय अल्पसंख्यांक,ग्रामीण लोकसंख्या यांना वाढती महागाई व जलवायू परिवर्तनामूळे, येणारी आपत्ती जसे पूर इत्यादी मुळे यांचे जीवनमान धोकादायक बनले आहे.भारतातील उपासमारीत (Hunger) अनुसूचित जाती,आदिवासी व ओबीसी वर्गातील लोकांची संख्या अधिक आहे.परंपरेने त्यांच्याकडे जमिनी आणि व्यवसाय नाहीत आहेत केवळ त्यांचे शारीरिक श्रम हेच त्यांचे जगण्याचे मुख्य साधन आहे.वाढती महागाई, व झोपडपट्टीतील गलिच्छ राहणीमान यामुळे होणारे साथीचे आजार , डेंगू,मलेरिया ,चिकन गुनिया सारखे वाढते आजार आणि वाढते प्रदूषण यामुळे गरीबाना आपल्या जीवनमानात बदल करणे असह्य झाले आहे.परिणामी भूक व कुपोषणाने ते प्रभावित होतात. ही असमानता सामाजिक नियमांमुळे आणि अन्न व कृषी धोरणावर प्रभाव पाडण्याची क्षमता नसलेल्या या गरीब लोकसंख्येमुळे होऊ शकते,असा निष्कर्ष ही GHI ने नोंदविला व काही शिफारशींची केल्या परंतु नव्या भारतात कुणीही गरीब नसेल,सर्वाना घर असेल,अशी न्यू इंडिया चे स्वप्न दाखवणाऱ्यांनात्या शिफारसी कितपत पचनी पडतील हा खरा प्रश्न आहे. सत्तेत असलेल्या प्रत्येकाला मेट्रो,बुलेट ट्रेन,स्मार्ट सिटी,उड्डाण पूल,भले मोठे हायवेज यात अधिक रस आहे. प्रत्येक राज्यकर्त्याला त्यांच्या कालावधीत काय केले हे दाखवायला मायलेज हवे आहे.गरिबांसाठी सरकारकडे काहीच योजना नाहीत असे नाही परंतु त्या सर्व आभासी प्रतिमा म्हणूनच काम करतात.भारत सरकारने 2019 पर्यंत दीनदयाल अंत्योदय योजना-NULM च्या माध्यमातून महात्मा गांधीच्या दिडशेव्या जयंती निमित्ताने एक कोटी कुटुंबाना दारिद्रय रेषेतून बाहेर काढण्याचे तर पन्नास हजार ग्रामपंचायती दारिद्र्यमुक्त करण्याचे ठरविले आहे. भारतात चाळीस कोटी लोकसंख्या दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात. यामुळे भारत हा जगातील Poverty Hub म्हणून ओळखल्या जातो.अश्या स्थितीत होणारे दारिद्यानिर्मुलनाची गती बघता भारत SDG-2030 चा पल्ला कधी गाठेल हा खरा प्रश्न आहे.त्याशिवाय दारिद्र्य निर्मुलन आणि माता व बालकाचे कुपोषण मुक्तीच्या DAY-NULM,DAY-NGLM,ICDS योजना ह्या मानधनावर काम करणाऱ्याच्या शिरावर आहेत.त्यामुळे कमी मानधनावर काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकाच कुपोषित असतील ? तर माता व बालकांचे कुपोषण खरेच संपणार का याचा सरकारने गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

**References**

1. http://www.ifpri.org/publication/2017-global-food-policy-report
2. Abundant Food Grain & Poverty : Addressing Challenges Developing country India pradipdande.blogspot.com
3. Dalit Nirantar Vishamta ani Daridrya,Sukhdev Thorat,sugava prakashan pune
4. https://www.indiafoodbanking.org/about/food-banking
5. https://www.scoopwhoop.com/11yearold-girl-dies-due-to-starvation/#.la9 s91xz2
6. योजना,अंक आठवा (मराठी ) 8 मार्च २०१७ अर्थ संकल्प २०१७-२०१८.